श्री. अरुण सखाराम सोनवणे, ग्रामपंचायत अधिकारी,
पं.स. राहाता यांचे ऐच्छिक सेवा निवृत्ती बाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-२
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-२/ग्रापं-१/६००/२०२६
दिनांक - स्वाक्षरीखाली नमूद प्रमाणे

वाचा:-१.गटविकास अधिकारी पंचायत समिती राहाता यांचा प्रस्ताव क्र.वशि/आस्था-२/३७४/२०२६ दि.१४/०७/२०२६ कार्यासनास प्राप्त दि.०४/०८/२०२६
२.या कार्यालयाकडील पत्र क्र. साप्रवि-२/ग्राप-१/४६८/२०२६ दि.०७/०८/२०२६
३.गटविकास अधिकारी पंचायत समिती राहाता यांच्याकडील पत्र क्र. वशि/आस्था-२/६१३/२०२६ दि.२३/०९/२०२६
४.गटविकास अधिकारी पंचायत समिती राहाता यांच्याकडील पत्र क्र. वशि/आस्था-२/३९०/२०२६ दि.२३/१०/२०२६
५. मा.मु.का.अ यांचेकडील अधिकार प्रदान आदेश क्र साप्रवि-१/रवका/६९६/१६ दिनांक १७/०६/२०१६
६. म.ना.से.(निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम क्र.६५

श्री. अरुण सखाराम सोनवणे, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती राहाता यांनी दि ३०/०६/२०२५ रोजीच्या अर्जान्वये ऐच्छिक सेवानिवृत्ती मंजूर करणेबाबत विनंती केली आहे आणि संबंधित कार्यालय प्रमुखांनी श्री. अरुण सखाराम सोनवणे, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती राहाता यांचेकडून कोणतेही शासकीय/जिल्हा परिषद येणे बाकी नाही व त्यांचे विरुध्द कोणतीही चौकशी चालु नाही अथवा प्रस्तावित नाही असे दाखले सादर केलेले आहेत. नियुक्ती प्राधिकारी हे ऐच्छीक सेवानिवृत्ती मंजूरीस सक्षम प्राधिकरण आहेत. संदर्भ क्र.५ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा), जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशाद्वारे, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम क्रमांक ६६ अन्वये श्री. अरुण सखाराम सोनवणे, यांच्या दिनांक ३०/०९/२०२६ रोजी मध्यानोत्तर ऐच्छीक सेवानिवृत्तीस, भविष्यात शासकीय/जिल्हा परिषदेकडील/ग्रामपंचायतीकडील वसुली पात्र रक्कम निघाल्यास संबंधितांना अथवा त्यांच्या वारसदारांना भरणे बंधनकारक राहील या अटीवर कार्योत्तर मंजूरी देत आहे.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक __20261117060222____ असा आहे.

सोबत:- श्री. अरुण सखाराम सोनवणे यांचे मुळसेवापुस्तक.

Digitally signed by
RAHUL ASHOK SHELKE
Date: 17-11-2026
10:59:38

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति - श्री. अरुण सखाराम सोनवणे, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती राहाता
द्वारा- गट विकास अधिकारी, पंचायत समिती राहाता

प्रत - गट विकास अधिकारी पंचायत समिती राहाता यांना कार्यवाहीसाठी रवाना.

२/- श्री. अरुण सखाराम सोनवणे, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती राहाता यांना दि ३०/०९/२०२६ रोजी मध्यानोत्तर कार्यमुक्त करावे, आणि पेन्शन प्रकरणाबाबत आवश्यक ते सर्व दाखले समाविष्ट करुन सत्वर सादर करणेची दक्षता घ्यावी. श्री. अरुण सखाराम सोनवणे, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती राहाता यांचे सेवानिवृत्ती नंतर भविष्यात शासकीय / जिल्हा परिषदेकडील / ग्रामपंचायतीकडील वसुली पात्र रक्कम निघाल्यास ती त्यांचे सेवानिवृत्तीपासुन मिळणा-या रक्कमेतून वसूल करण्यात यावी.

प्रत - मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी , जिल्हा परिषद, अहिल्यानगर

प्रत - ग्रापं- ८ पेन्शन, ग्रामपंचायत विभाग ,जिल्हा परिषद अहिल्यानगर

स्वाक्षरीत/-
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
जिल्हा परिषद अहिल्यानगर